# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०४/२०२४ (गुरूवार) दुपार**

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

**पोस्टे काटोल :–** अंतर्गत होळी मैदान काटोल येथे फिर्यादी नामे– सौ. प्रगती जितेंद्र तायडे वय २७ वर्ष रा. मदना ता. नरखेड हल्ली मुक्काम गोलु गजभिये यांचे घरी किरायाने होळी मैदान काटोल व आरोपी नामे– जितेंद्र सिदधार्थ तायडे वय ३१ वर्ष रा. हल्ली मुक्काम गोलु गजभिये यांचे घरी किरायाने होळी मैदान काटोल हे पती पत्नी असुन फिर्यादी हि घरी हजर असता आरोपी हा दारू पिवुन घरी आले व फिर्यादीला बोलने चालु केले की तु फोनवर तुझ्या यारासोबत बोलत होती का मी घरून गेल्यावर तुझे असेच चालु राहते का असे म्हणुन फिर्यादीसोबत आरोपीने झंगडा भांडन करून मारहान केले व मारता मारता आरापीने उंदीर मारायचे पावडरची पुडी खिशातुन काढुन पुडी फोडुन प्याला मध्ये टाकुन प्यालात पानी टाकल व सतत मारहान करून तु हे पाणी पी आणी मर असे म्हणुन आरोपीने फिर्यादीला पुन्हा मारहान केले त्यामुळे माराच्या भितीने फिर्यादीने प्यालातील विषारी औषध पिले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे काटोल येथे आरोपीविरूद्ध कलम ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि शितल खोब्रागडे मो. नं ८३०८०८२०९४ या करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, सपोनि शितल खोब्रागडे, पोहवा भुक्ते, पोशि सुधीर चव्हान सचिन डायलकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर